## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
## औरंगाबाद

**जनसंवाद व वृत्तपत्रविद्या** तदर्थ मंडळाची बैठक आज **दिनांक २० व २१-०२-२०१५** रोजी सकाळी ११:३० वाजता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारती मधील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहामध्ये संपन्न झाली.

**सदरील बैठकीस खालील सदस्य उपस्थित / अनुपस्थित होते.**

| अ.क्रं. | अध्यक्ष / सदस्य | स्वाक्षरी | अ.क्रं. | अध्यक्ष / सदस्य | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| १) | डॉ. व्ही.एल.धारुरकर (अध्यक्ष), | **उपस्थित** | ३) | डॉ. नामदेव पी. सानप, | **उपस्थित** |
| २) | डॉ. रेखा शेळके, | **उपस्थित** | ४) | डॉ. दिपक शिंदे, | अनुपस्थित |
| | | | ५) | डॉ. सुंदर राजदीप. | अनुपस्थित |

सदरील बैठकीत खालील विषयावर चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात आले.

| | |
|---|---|
| १) | मागील बैठकीचा इतिवृत्तांत कायम करणे बाबत. |
| * | **मागील बैठकीचा इतिवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.** |
| २. | सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या दिनांक १२-१२-२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या शिफारशीनुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बी. ए. तृत्तीय वर्षाच्या अभ्यासक्रमाला सत्र निहाय प्रत्येक पेपर ५० गुणांचा ठेवून त्यानुसार अभ्यासक्रम सुधारीत करणे तसेच १०० गुणांचा वार्षिक प्रकल्प अहवाल (८० गुण प्रकल्प लेखन व २० गुण प्रकल्प सादरीकरण) ठेवण्यानुसार अभ्यासक्रम सुधारित करुण कार्यालयात सादर करणे बाबत. |
| * | **सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या बैठकीच्या ठरावान्वये बी. ए. तृत्तीय वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी लेखी पेपर ५० गुणांचा करण्यात आला, तसेच प्रकल्प अहवाल १०० गुणांचा करण्यात आला व त्यात ८० गुण विद्यार्थ्यांच्या कार्यास व २० गुण मौखिक साठी ठेवण्यात आले.** |
| ३. | विद्यापीठ अनुदान आयोग व मा. कुलगुरुंनी दि. २८-०१-२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशान्वये सर्व संलग्नीत महाविद्यालय स्तरावर शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सर्व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाला Credit Based with Grade System लागू करुन त्यानुसार अभ्यासक्रम अद्यावत करणे, प्रवेश घेण्याबाबतचा अध्यादेश-१, परिक्षा शुल्काचा अध्यादेश-२ व परिक्षा व इतर संबंधीचे नियामके तयार करणे बाबत. |

| | |
|---|---|
| * | **विद्यापीठ स्तरावर Credit Based with Grade System लागू करण्यात आल्यानुसार संलग्न महाविद्यालयात सुध्दा या प्रकारचा वापर करयास अनुमती देण्यात आली, त्यानुसार प्रवेश घेण्याबाबतचा अध्यादेशा-१ , परिक्षा संबंधीचा अध्यादेश-२ व इतर संबंधीचे नियामके तयार करण्यासाठी डॉ. दिनकार माने अध्यक्ष, डॉ. रेखा शेळके व डॉ. नामदेव सानप यांची समिती ठरविण्यात आली व सदरील समितीने आठ दिवसाच्या आत संबंधीत अभ्यासक्रम नियामकासह तयार करुन सादर करण्यात यावे, असे ठरले.** |
| ४. | सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या दिनांक १२-१२-२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या शिफारशीनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या “राजकीय विचार” चा समावेश अभ्यासक्रमात करणे बाबत. |
| * | **राजकीय विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासाठी मान्यता देण्यात आली, यासाठी Principal of Allass conceits या पेपर १ मध्ये पुढिल भाग समाविष्ट करण्याचे ठरले, तसा अभ्यासक्रम तदर्थ मंडळाकडून तयार करुन तो सर्वांना मान्यतेसाठी पाठविण्यात यावे, असे ठरले.** |
| ५. | सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या दिनांक १२-१२-२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या शिफारशीनुसार व विद्यापरिषदेच्या दिनांक ३०-०९-२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील प्रस्ताव क्र.१० च्या ठरावान्वये कुठल्याही शाखेचा पदवीधर विद्यार्थी कुठल्याही शाखेच्या पदव्युत्तर पदवीच्या प्रवेशास प्रवेशपूर्ण परीक्षेसह ब्रिर्ज कोर्स पूर्ण करुन पात्र समण्याकरीता त्यावर चर्चा करणे बाबत. |
| * | **एम. ए. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या या ब्रिज कोर्सच्या कालावधी, घटक आणि परिक्षा ठरविण्यासाठी प्रा. जयदेव डोळे, अध्यक्ष, डॉ. दिनकर माने, डॉ. नामदेव सानप यांची उप-समिती नेमण्यात आली या समितीने ब्रीज कोर्स तयार करुन तो आठ दिवसाच्या आत तदर्थ मंडळाच्या अध्यक्षांना सादर करावा, असे ठरले.** |
| ६. | ऐणवेळेचे काही विषय असल्यास ? |

शेवटी अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपन्न झाली.

**स्वा/-**
**कुलसचिवाकरीता.**

**अध्यक्ष,**
**जनसंवाद व वृत्तपत्रविद्या तदर्थ मंडळ.**

-=**=-

कै.*०२०३१५/-